# कॉन्ट्रॅक्ट दाराकडून ११.५० लाखाची खंडणी वसूल करणारे अटकेत.

फिर्यादी मोहमद हुसेन अन्सारी, हे प्लंबीग कॉन्ट्रकटर असुन, दिनांक ०८.०९.२०१७ रोजी सायंकाळी १९.१५ वा.चे सुमारास अज्ञात ५ इसमांनी त्यांचे चारचाकी गाडीस पाठीमागून धडक दिल्याने त्यांनी गाडी रस्त्याचे कडेस उभी केली असता, पाठीमागील गाडीतून उतरलेल्या लोकांनी त्यांना हाताने व लाकडी दांडक्याने मारहाण करण्यास चालू केली. त्यामध्ये त्यांचे डोक्यास मार लागून त्यांना चक्कर आल्याने ते बेशुध्द पडले होते. जाग आली तेंव्हा त्यांचे हात बांधलेले होते, व डोळयावर पट्टी बांधलेली होती, त्यांना एका खोलीत डांबुन ठेवलेले होते, आणि सोबत असणारे ४ लोकांनी त्यांना २० लाख रूपयाची खंडणी मागीतली. आणि जर खंडणी दिली नाही तर जिवे ठार मारण्याची धमकी दिली. नमुद इसमांनी त्यांना खंडणीचे पैसे मिळत नाही तो पर्यंत अज्ञात ठिकाणी ३ दिवस हात बांधुन व डोळयावर पट्टी बांधुन डांबून ठेवून, फिर्यादीचे मोबाईल वरून फिर्यादीस त्याचे ओळखीचे लोकांना फोन करून पैशाची व्यवस्था करण्यास सांगीतले होते. त्याप्रमाणे ११.५० लाख रूपये खंडणी मिळाल्यानंतर नमुद आरोपींनी फिर्यादीस सोडून दिले होते. त्यानंतर पुंन्हा नमुद आरोपींनी दिनांक १४.११.२०१७ व ०८.१२.२०१७ रोजी २० लाखाच्या खंडणीतील राहीलेले पैशासाठी फोनकेला होता.

दाखल गुन्ह्यातील अनोळखी आरोपींबाबत तपास करीत असताना, संशयीतइसम १) मुकेश मारूती राऊत, वय ३३ वर्षे, रा. अजंठानगर शिवराजा हौसींग सोसायटी बिल्डींग नंबर २, पाचवा माळा रूमनंबर ५०७ चिंचवड, पुणे २) निलेश किशोर कोकरे, वय २० रा. रुमनंबर ६०२ योगायोग बिल्डींग सहावा मजला घरकुल चिंचवड यांनी दाखल गुन्हा हा केला असल्याची माहीती मिळाल्याने त्यांना दिनांक ०६.०२.२०१८ रोजी अटक करून त्यांचेकडे तपास करता त्यांनी दाखल गुन्हा केला असल्याचे कबुली देवून तो त्यांनी त्यांचे साथीदार ३) सिराज रुस्तम अन्सारी वय २५ वर्षे, रा. अे साईट, घरकुल, चिखली पुणे, ४) राजु विलास गायकवाड वय ३५ वर्षे, रा. मोहननगर, फुलेनगर,पुणे ५) अशोक ऊर्फ लंब्या भिमराव जावळे वय २८ वर्षे, विदयानगरी, चिंचवड पुणे यांचेसह केला असल्याचे सांगीतले. तसेच त्यांनी आरोपीत नामे ६) विजय बबन वाडेकर रा.डोंजे पुणे याची टाटा सफारी गाडी नंबर एम.एच.११.एम.व्ही २००२ हिचा वापर गुन्हा करण्यासाठी केला तसेच फिर्यादीस डोंणे येथील घरी खंडणी मिळेपर्यंत डांबून ठेवले होते.

आरोपीत ३) सिराज रुस्तम अन्सारी वय २५ वर्षे, रा. अे साईट, घरकुल, चिखली पुणे, याचे सांगण्या वरून केला असल्याचे सांगून, सिराज अन्सारी हा यापुर्वी फिर्यादी यांचेकडे कामास होता. व फिर्यादी हे कोठे राहतात, कोठे काम करतात व त्यांचेकडे किती पैसे असतात याची पुर्ण कल्पना त्यास होती. त्यानुसार पाचही आरोपींतांनी फिर्यादी यांना दिनांक ०८.०९.२०१७ रोजी सकाळी त्यांचे कोंढवा येथील राहते घरातून बाहेर आल्यानंतर किडनॅप करण्याचे ठरविले. व त्याकरीता विजय बबन वाडेकर याचे काळ्या रंगाची सफारी गाडीने सर्वजण चिंचवड येथुन सकाळी

Pune Police

६ वाजता फिर्यादी यांचे घराजवळ ट्रॅप लावुन बसले, परंतु नमुद दिवशी फिर्यादी हे त्यांचे राहते घरातुन लवकर बाहेर आले नाहीत, ते बाहेर आल्यानंतर ते त्यांचेकार मधुन जात असताना आरोपितांनी पाठलाग केला परंतु रस्यात चुकामुक झालेने, आरोपीतांनी त्यांना त्यांचे कामाच ठिकाणा वरून किडनॅप करण्यासाठी तेथे दिवसभर ट्रॅप लावुन बसले व फिर्यादी हे कामावरून त्यांचे कारमधुन घरी जाणेसाठी निघाले असता त्यांनी त्यांचे गाडीने पाठलाग चालु केला, फिर्यादी यांना मुंबई - बेंगलारे हायवे वरील अर्चिड हॉटेल जवळ धडक मारून, ते गाडीतुन खाली उतरल्यानंतर त्यांना हाताने व लाकडाने मारहाण करून, ते बेशुध्द झाल्यानंतर त्यांचे डोळे व हात पाय बांधून विजय वाडेकर याचे डोंणे येथील घरात डांबून ठेवले होते. तसेच ३ दिवसा मध्ये फिर्यादी यांना त्यांचे ओळखीचे लोकांबरोबर बोलण्यास सांगून पैशाची व्यवस्था झाल्यानंतर फिर्यादी यांना त्यांचे स्वतःचे गाडीत बसवून गाडी ही एक्सप्रेस हायवेर सोडून दिले. तसेच त्या नंतर त्यांना वेळोवेळी पुंन्हा उर्वरीत पैशाची मागणीकरीता फोन केला असल्याचे तपासात निष्पन्नझाले आहे.

आरोपीत निलेश किशोर कोकरे याचेकडे तपास करता त्याने त्याचा साथीदार अतुल निसरगंधं याच्यासह पुणे शहरात ठिकठिकाणी मोबाईल चोरीचे गुन्हे केले असून त्यासाठी वापरलेली मोटारसायकल व ३ मोबाईल किं.रू ८७,०००/- ची मालमत्ता हस्तगत करण्यात आली आहे.

आरोपीत यांचे विरूध्द यापुर्वी दाखल असलेल्या गुन्ह्यांची माहीती पुढील प्रमाणे १) मुकेश मारूती राऊत, याचे विरूध्द अपहराणाचा गुन्हा दाखल आहे. २) निलेश किशोर कोकरे, हा दुखापतीच्या गुन्ह्यात पाहीजे आरोपी आहे. ३) सिराज रुस्तम अन्सारी याचेविरूध्द दरोडा, जबरी चोरी, दुखापत सारखे ५ गुन्हे दाखल आहेत. ४) राजु विलास गायकवाड याचेविरूध्द दरोडा, जबरी चोरी, खुनाचा प्रयत्न सारखे ५ गुन्हे दाखल आहेत. ५) अशोक ऊर्फ लंब्या भिमराव जावळे याचे विरूध्द याचेविरूध्द दरोडा, जबरी चोरी, सारखे ३ गुन्हे दाखल आहेत. ६) विजय बबन वाडेकरयाचे विरूध्द दरोडा व जबरीचोरीचे गुन्हे दाखल आहेत.

वरील कामगिरी गुन्हे शाखचे श्री. प्रदीप देशपांडे, अपर पोलीस आयुक्त, श्री. पंकज डहाणे, पोलीस उप-आयुक्त, श्री. समीर शेख, सहाय्यक पोलीस आयुक्त-१. यांचे मार्गदर्शना खाली युनिट ३ गुन्हे शाखा चे सिताराम मोरे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, रविंद्र बाबर, सपोनि, संदीप तळेकर, गुणशिलन रंगम, अनिल घाडगे, महेंद्र पवार, गजानन गाणबोटे, अनिल भोसले, आजिनाथ काळे, रोहीदास लवांडे, शिवानंद स्वामी, अतुल साठे, संदीप राठोड, कल्पेश बनसोडे, सुजीत पवार यांनी केली आहे.


पुणे शहर